CMYK

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 09 ■ शनिवार, 08 फेब्रुवारी 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

# दैनिक आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

### कौडगाव एमआयडीसीत उद्योजकांना अनुदानासह मिळणार सुविधा



>> सविस्तर वृत्त पान ३

### सावधान! मुंबईमध्ये जीबीएस चा पहिला रुग्ण आढळला

आरंभ मराठी । मुंबई

मुंबईतून एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सध्या पुण्यात घोंगावत असलेल्या जीबीएस आजाराने आता मुंबईतही शिरकाव केला आहे. मुंबईतील अंधेरी भागात एका पुरुषाला गुइलेन – बॅरे – सिंड्रोम झाल्याचे आढळले आहे. या रुग्णाला रुग्णालयात दाखल केले आहे. परंतु अद्याप बीएमसीकडून अधिकृतरित्या ही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

# सोयाबीन खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्या; शेतकरी आक्रमक

## जिल्हा पणन अधिकाऱ्यांनाच घातला घेराव

### धाराशिव जिल्ह्यातील २१ हजार शेतकऱ्यांना मुदतवाढीची प्रतीक्षा

आरंभ मराठी । धाराशिव

**सोयाबीन खरेदीसाठी शासनाने दोन वेळा मुदतवाढ दिली. दुसऱ्यांदा दिलेल्या मुदतीचा गुरूवारी (दि.६) शेवटचा दिवस होता. परंतू खरेदी केंद्रावरील नियोजन कोलमडल्याने ग्रामीण भागातून सोयाबीन घेवून आलेल्या वाहनांच्या खरेदी केंद्रांवर रांगा पहावयास मिळाल्या. शुक्रवारी मुदत संपल्यामुळे एकही खरेदी केंद्र सुरू नव्हते. त्यामुळे संतप्त झालेल्या तुळजापूर येथील शेतकऱ्यांनी धाराशिव येथील कार्यालयात येऊन जिल्हा पणन अधिकारी मनोज कुमार वाजपेयी यांना घेराव घातला. यावेळी वाजपेयी यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन खरेदी केंद्रास मुदतवाढ मिळावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनी जिल्हा पणन अधिकाऱ्यांना मुदतवाढ करण्यासंदर्भात निवेदन दिले.**

सोयाबीन खरेदी सुरू झाल्यापासून ते आतापर्यंत धाराशिव जिल्ह्यातील २१ केंद्रावर १४ हजार २५७ शेतकऱ्यांची खरेदी करण्यात आली आहे. जिल्ह्यात नोंदणी केलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी फक्त ४० टक्के शेतकऱ्यांची खरेदी करण्यात आली आहे तर ६० टक्के शेतकरी मुदतवाढीच्या प्रतीक्षेत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील २१ खरेदी केंद्रावर ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २५ हजार १५७ शेतकऱ्यांना मेसेज पाठवण्यात आले होते. त्यामध्ये १४ हजार २५७ शेतकऱ्यांचे सोयाबीन प्रत्यक्षात खरेदी केले आहे तर २१ हजार १४६ शेतकरी मुदतवाढ मिळण्याची प्रतीक्षा करत आहेत. नाफेडने जिल्हा पणन संघाच्या माध्यमातून जिल्ह्यात शेतमाल खरेदीसाठी २१ ठिकाणी खरेदी केंद्र उघडले. १५ ऑक्टोंबरपासून नाफेडने सोयाबीनची खरेदी सुरू केली. सुरूवातीला खरेदीला प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, नंतरच्या काळात बाजारातील दर घसरल्याने नाफेडच्या केंद्राकडे खरेदी वाढली. अचानक खरेदी वाढल्याने काही काळ बारदानाचा प्रश्न निर्माण झाला होता. शेतकऱ्यांची वाढती गर्दी लक्षात घेता सोयाबीन खरेदीसाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत वाढविण्यात आली होती. परंतू मागणीनंतर खरेदीला पुन्हा ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मिळाली होती. वाढीव मुदतीत ५० टक्के शेतकऱ्यांची देखील खरेदी होऊ शकली नाही. आता खरेदीला मुदतवाढ मिळावी या मागणीसाठी जिल्ह्यातील शेतकरी आक्रमक झाल्याचे चित्र दिसत आहे.





### मुदतवाढ मिळण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू

धाराशिव जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करणे बाकी आहे. तुळजापूर येथील शेतकऱ्यांनी मुदतवाढीसाठी निवेदन दिले आहे. आमच्या कडूनही शासनाकडे मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळेल अशी शक्यता वाटते.

**–मनोज कुमार वाजपेयी**
**जिल्हा पणन अधिकारी, धाराशिव.**

### जिल्ह्यातील २१ खरेदी केंद्रांची अंतिम आकडेवारी

| खरेदी केंद्र | एकूण नोंदणी | एसएमएस केलेल शेतकरी | खरेदी केलेले शेतकरी | राहिलेले शेतकरी |
|---|---|---|---|---|
| दास्तापुर | १८४४ | १८४४ | १००३ | ८४१ |
| कळंब | ३६७९ | १५९४ | १२१७ | २४६२ |
| गुंजाटी | १६१४ | ९०५ | ३४१ | १२७३ |
| कानेगाव | १९३० | १९३० | ९०९ | १०२१ |
| सोनेवाडी | १०३७ | ९३५ | ६८८ | ३४९ |
| पारा | ५२६ | ४४९ | २८७ | २३९ |
| परंडा | ३५३ | ३४८ | १७२ | १८१ |
| पाथरुड | १०१३ | १००२ | ८५८ | १५५ |
| धाराशिव | ३३७९ | १९२९ | ९२३ | २४५६ |
| ढोकी | २३१८ | ११५९ | ५४७ | १७७१ |
| चोराखळी | २९६० | २३२० | १२२३ | १७३७ |
| उमरगा | १७८८ | ९०४ | ९९६ | ७९२ |
| नळदुर्ग | ८०० | ७९८ | ३१७ | ४८२ |
| भूम | १७९० | १२२० | ६६० | ७३० |
| शिराढोण | ६२४ | २८७ | १३१ | ४९३ |
| ईट | १४३३ | ९२७ | ६३२ | ८०१ |
| तुळजापूर | १७७६ | १४०३ | ४८६ | १२९० |
| कनगरा | १६०९ | ११९६ | ८२६ | ७८३ |
| चिखली | २५९२ | १३०२ | ८०० | १७९२ |
| टाकळी बेंबळी | ५५८ | ५५१ | २७८ | २८० |
| वाशी | २१८० | २१५४ | ९६३ | १२१७ |
| **एकूण** | **३५४०३** | **२५१५७** | **१४२५७** | **२११४६** |

### पायी चालत जाणाऱ्या महिलेचे गंठन हिसकावून चोरटे पसार

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील मुख्य भागात पायी चालत जाणाऱ्या महिलेचे गंठन हिसकावून चोरटे मोटारसायकलवर पसार झाल्याची घटना घडली. मनिषा विश्र्वास शेवाळे (वय ३२ वर्षे, रा. बँक कॉलनी, सरस्वती शाळेसमोर, धाराशिव) या बुधवारी (दि.५) सायंकाळी पाच वाजता गजानन मंदीरा जवळ उतरुन पायी चालत जात होत्या. त्यावेळी पोस्ट कॉलनी येथील लक्ष्मी मंदीर येथे समोरुन येणाऱ्या काळ्या रंगाच्या मोटरसायकल वरील अनोळखी दोन व्यक्तींपैकी मागे बसलेल्या व्यक्तीने मनिषा शेवाळे यांच्या गळ्यातील ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण जबरीने लटुन पसार झाले. मनिषा शेवाळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सीना कोळेगाव धरणातून दोन बोटींची चोरी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

आरंभ मराठी । अंबी

परंडा तालुक्यातील सीना कोळेगाव धरणातून दोन बोटी चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. दिनांक ५ फेब्रुवारीच्या रात्री सिना कोळेगाव धरणात बंगाळवाडी शिवारात अवैध वाळु उपसा करणाऱ्या दोन बोटी महसूल प्रशासनाला दिसून आल्या होत्या. त्या बोटी पाण्याच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता, त्या पाण्याच्या बाहेर काढणे शक्य न झाल्याने महसूल कर्मचाऱ्यांनी त्या बोटी तेथेच ठेवल्या होत्या. त्या बोटी आरोपी अविनाश हांगे, दादा ईटकर (दोघे रा. सोनारी ता. परंडा) यांनी इंजीनसह चोरुन नेल्या. चोरलेल्या बोटींची किंमत अंदाजे ३,५०,००० रुपये आहे. फिर्यादी आकाश नागोराव वानखडे (वय ३२ वर्षे, रा.व्यवसाय– ग्राम महसुल अधिकारी डोमगाव ता. परंडा) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन अंबी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३(५), सह कलम २१(१), २१(२) खान व खनीज अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## शेतकरी प्रश्नावर खासदार ओमराजे निंबाळकर यांची केंद्र सरकारवर टीका

आरंभ मराठी । धाराशिव



लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी विविध विषयांवर सरकारच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी विशेषतः शेती, विमा, रेल्वे आणि आरोग्य क्षेत्रातील समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.

खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी संसदेत बोलताना नाफेड अंतर्गत धाराशिव लोकसभा मतदारसंघातील ४४,०१३ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असली तरी केवळ १५,७९८ शेतकऱ्यांकडूनच सोयाबीन खरेदी करण्यात आल्याचे स्पष्ट केले. उर्वरित २८,००० शेतकरी अजूनही वंचित असून शेतकऱ्यांचे शेवटचे पोते विक्री होईपर्यंत खरेदीस मुदतवाढ देण्याची मागणी त्यांनी केली. महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाने सोयाबीनसाठी ७,००० रुपये प्रति क्विंटल दर सुचवला असतानाही केंद्राने केवळ ४,८९२ रुपये प्रति क्विंटल दर जाहीर केला आहे, हे स्पष्ट करत राजेनिंबाळकर यांनी सरकारला आक्रमक शब्दांत जाब विचारला. २०१६ मध्ये सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, पण प्रत्यक्षात उत्पन्न दुप्पट होण्याऐवजी उत्पादन खर्चच दुपटीने वाढला आहे, अशी टीका त्यांनी केली. प्रधानमंत्री फसल विमा योजनेंतर्गत केंद्र, राज्य आणि शेतकरी मिळून ४२,००० कोटी रुपये विमा प्रीमियम भरले असतानाही केवळ ३६,००० कोटी रुपयेच शेतकऱ्यांना भरपाई म्हणून मिळाले आहेत. ५,००० कोटी रुपयांचा नफा खाजगी विमा कंपन्यांनी कमावला, याकडे लक्ष वेधत, ही रक्कम कंपन्यांना न देता थेट शेतकऱ्यांना देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली. राजेनिंबाळकर यांनी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नदीजोड प्रकल्पासंदर्भात कोणतीही तरतूद या अर्थसंकल्पात नसल्याचे सांगितले. पुरग्रस्त भागांतील पाणी दुष्काळी भागात वळवण्याची योजना सरकारने का पुढे नेली नाही, असा सवाल करत, हा प्रकल्प तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी केली.

### काँग्रेसच्या माजी आमदाराला अटक, अजिंठा बॅंक गैरव्यवहार प्रकरणात मोठी कारवाई

आरंभ मराठी । छत्रपती संभाजीनगर

अजिंठा बँक गैरव्यवहार प्रकरणी काँग्रेसचे माजी आमदार सुभाष झांबड यांना पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात येत होता. आज त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. २१ जानेवारी रोजी न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता तेव्हापासूनच अटक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. आज अखेर सुभाष झांबड यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. काँग्रेसचे माजी आमदार सुभाष झांबड अझिंठा अर्बन बँकेचे अध्यक्ष असून बॅकेमधील ९८ कोटी ४८ लाख व २१ कोटी रूपयाच्या घोटाळा प्रकरणात त्यांच्यावर सीटीचौक पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत.

## नॅशनल गेम्समध्ये महाराष्ट्राला मिक्स इव्हेंटमध्ये सुवर्ण तर टीम इव्हेंटमध्ये कांस्यपदक

### धनुष्यात बिघाड होऊनही भावनाने साधला सुवर्णवेध

आरंभ मराठी । डेहराडून



डेहराडून येथील राजीव गांधी क्रिकेट स्टेडियममध्ये चालू असलेल्या ३८ व्या नॅशनल गेम्स मध्ये महाराष्ट्राच्या जिगरबाज तिरंदाजांनी इंडियन राउंड मध्ये १ सुवर्ण व १ कांस्य पदक पटकावत मैदान दणाणून सोडले. गौरव चांदणे व भावना सत्त्यगिरी यांनी मिक्स इव्हेंट मध्ये सुवर्ण पदक तर अनिकेत गावडे, गौरव चांदणे, रोशन सोळंके व पवन जाधव यांनी कास्यपदक पटकावत बाजी मारली.

इंडियन राउंड मिक्स इव्हेंट मध्ये भावना सत्त्यगिरी ( पुणे) व गौरव चांदने ( अमरावती ) यांनी उपांत्यपूर्व फेरीत यजमान उत्तराखंड संघावर ५–१ ने विजय प्रस्थापित करत उपांत्य फेरीत आसाम संघास ५–१ ने पराभूत करत अंतिम सामन्यात झारखंड संघावर ६ – २ ने वर्चस्व ठेवत सुवर्णपदक पटकाविले.

तर इंडियन राउंड टीम इव्हेंट मध्ये अनिकेत गावडे ( सातारा ), गौरव चांदणे, रोशन सोळंके व पवन जाधव ( सर्व अमरावती ) या पुरुष संघाने उपांत्यपूर्व सामन्यात आंध्र प्रदेश संघावर ६–० ने विजय प्रस्थापित केला. अतिशय अटीतटीच्या झालेल्या उपांत्य सामन्यात उत्तर प्रदेश संघासोबत ३–५ ने सामना गमवावा लागला. पुढे कांस्य पदकासाठी ओडिसा संघा सोबत झालेल्या सामन्यात ६–० असा एकतर्फी विजय प्रस्थापित केला. दोन्ही संघाच्या मागे अमर जाधव यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.

नॅशनल गेम्स मध्ये सहभागी झालेल्या आर्चरी संघाचे संघ व्यवस्थापक म्हणून प्रवीण गडदे हे तर संघ मार्गदर्शक म्हणून अमर जाधव, समीर म्हस्के, कुणाल तावरे व प्रवीण सावंत यांनी काम पाहिले. महाराष्ट्राच्या धनुर्धरांनी केलेल्या कामगिरी बद्दल महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार, सचिव नामदेव शिरगावकर, कोषाध्यक्ष ड. धनंजय भोसले, सहसचिव तथा महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ड प्रशांत देशपांडे, महासचिव प्रमोद चांदुरकर, उपपथक प्रमुख सुनील पूर्णपात्रे आदींसह संघटनेचे पदाधिकारी खेळाडू आणि क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले आहे. ३८ व्या नॅशनल गेम्स मध्ये महाराष्ट्र आर्चरी संघाने ३ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य पदक असे एकूण ५ पदके राज्यास मिळवून दिली आहेत.

## वाईन शॉप मालकाला खंडणीची मागणी;तेरा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील वाईन शॉपच्या मालकाला तेरा जणांच्या जमावाने खंडणीची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यातील आरोपी संदीप बनसोडे (रा. धाराशिव) यांच्यासह इतर १२ लोकांनी दिनांक ५ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील राजा वाईन शॉप येथे फिर्यादी संजय राजाराम अडवाणी (वय ५१ वर्षे, रा.नाईकवाडी नगर, धाराशिव) यांच्याकडून पैसे न देता बियर घेतली. अडवाणी यांनी त्यांना बिअरचे पैसे मागीतले असता, आरोपींनी त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवाण्याची धमकी दिली. तसेच तुझे दुकान चालु राहण्यासाठी ५,००० रुपये खंडणी मागुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. संजय अडवाणी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०८(२),११५(२), ३५२, ३५१(२)(३), १८९(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## परंडा येथे महसूल कर्मचाऱ्यास कार्यालयातच मारहाण

### कारवाईसाठी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन; नागरिकांच्या कामाचा खोळंबा

### मंडळ अधिकारी, तलाठी, कार्यालयीन कर्मचारी व शिपाई आंदोलनात सहभागी

आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील खासगाव येथील शेतकऱ्याच्या तक्रारी अर्जावर काय कारवाई केली असे म्हणत तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक जगन्नाथ खुने यांना मारहान केल्याची घटना शुक्रवारी (दि.७) घडली.

जगन्नाथ खुने यांना मारहाण करणाऱ्या आरोपी विरूध्द कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी महसुल कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांच्या काम बंद आदोलनामुळे तहसील कार्यालयात कामानिमित्त आलेल्या नागरीकांच्या कामाचा खोळंबा झाला. महसुल कर्मचारी संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खासगाव येथील शेतकरी भाऊसाहेब यांच्या तक्रारी अर्जावर काय कारवाई केली असे जरीचंद गोडगे यांनी महसुल सहाय्यक जगन्नाथ खुने यांना विचारणा केली व दमदाटी व शिवीगाळ करीत मारहान केली. खासगाव येथील शेतकरी भाऊसाहेब यांच्या अर्जाचा व जरीचंद गोडगे यांचा कसलाही सबंध नसताना एजंट म्हणुन तहसील कार्यालयात गोडगे हे वारंवार वावरत आहेत. कर्मचाऱ्यास मारहाण करणाऱ्या जरीचंद गोडगे यांच्यावर जोपर्यंत कारवाई होत नाही तोपर्यंत बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनावर जगन्नाथ खुने, मंदार कदम, एन के मोहिलवाड, ए.एच. किणीकर, यू.आर.लवटे, एम.एल. मैदपवाड, एम.ए.वाघमारे, पाटील,बी.ए.डावरे, नितीन भांडवलकर, एम.एम.पठाण, नागेश करळे, ए.ए.मलगोंडे,मंडळ अधिकारी पवार,तलाठी बालाजी डावकरे, धानुरे,नागलोत,तोरकडे, साळुंके यांच्यासह कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### नळदुर्ग येथून एक म्हैस व गाय चोरीला

आरंभ मराठी । नळदुर्ग



नळदुर्ग शिवारातून शेतात बांधलेल्या एका म्हशीची व गाईची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली.संतोष रामचंद्र मुळे (वय ४१ वर्षे, रा. मराठा गल्ली नळदुर्ग) यांच्या रामतिर्थ शिवारातील शेतावरील बांधावर बांधलेली एक म्हैस व एक गाय दिनांक ४ फेब्रुवारी च्या रात्री चोरून नेल्या. संतोष मुळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

संपादकीय...

शनिवार दि. 08 फेब्रुवारी 2025



# जपावे आपले आरोग्य ..आपणच

आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस इतका गुंतून गेला आहे की, त्याला स्वतःकडे बघायला वेळच मिळत नाही. सकाळी मोबाईलच्या गजराने जाग येते आणि रात्री उशिरापर्यंत स्क्रीनवर डोळे खिळून राहतात. दिवसाचा जास्तीत जास्त वेळ काम, जबाबदाऱ्या आणि सोशल मीडियामध्येच जातो. याचा परिणाम शरीर आणि मन दोघांवरही होतो. हल्ली मधुमेह, बीपी, हृदयविकार, लठ्ठपणा आणि मानसिक तणाव या समस्या वाढत चालल्या आहेत. पूर्वी पन्नाशीनंतर ज्या आजारांची भीती वाटायची, तेच आज वयाच्या तिशीमध्येच लोकांना त्रास देऊ लागले आहेत. यामागचं कारण म्हणजे धावपळीचं आयुष्य, चुकीची सवय आणि स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष. त्यामुळे कितीही कामाच्या व्यापात असलो, तरी थोडा वेळ स्वतःसाठी द्यायलाच हवा.



अनेक लोक असं म्हणतात की, आमच्याकडे वेळच नसतो! पण हा फक्त एक बहाणा आहे. दिवसाला २४ तास असतात आणि त्यातून केवळ एक तास स्वतःसाठी काढणं कठीण नाही. आपण जर आज स्वतःकडे लक्ष दिलं नाही, तर उद्या डॉक्टरांकडे जावं लागेल. लहानशा दुखण्याकडे दुर्लक्ष केलं, तर पुढं मोठा त्रास होऊ शकतो. त्यामुळे वेळेत सावध होणं महत्त्वाचं आहे.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे आहार. आजकाल लोक बाहेरच्या जेवणावर जास्त अवलंबून आहेत. जंक फूड, तळलेले पदार्थ आणि पॅकबंद पदार्थ खाण्याची सवय वाढली आहे. हे पदार्थ चविष्ट असले तरी आरोग्यासाठी घातक आहेत. त्यामुळे शरीर बिघडतं, वजन वाढतं, रक्तदाब आणि साखर अनियंत्रित होते. त्याऐवजी घरचं सकस आणि सत्त्वयुक्त अन्न खाल्लं पाहिजे. भरपूर पाणी प्यावं, हिरव्या भाज्या, फळं आणि ताजं अन्न खावं.

फक्त चांगला आहार घेऊन उपयोग नाही, तर शरीराला हलवणंही गरजेचं आहे. हल्ली लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच मोबाईल, टीव्ही आणि लॅपटॉपमध्ये अडकले आहेत. बाहेर फिरायला, खेळायला आणि शारीरिक श्रम करायला कुणालाच वेळ नाही. पूर्वी लोक रोज चालत, शारीरिक कामं करत, त्यामुळे त्यांची तब्येत उत्तम राहायची. पण आता तासनतास एका ठिकाणी बसून राहिल्याने लठ्ठपणा, पाठदुखी, सांधेदुखी वाढली आहे. यावर एकच उपाय आहे – रोज किमान अर्धा तास चालणं, व्यायाम करणं किंवा योगासने करणं.

शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्यही महत्त्वाचं आहे. तणाव, चिंता आणि निराशा वाढली आहे. सतत कामाचा ताण, पैशाची चिंता, भविष्याची भीती यामुळे माणूस आनंद विसरून गेला आहे. अनेक लोक या तणावातून डिप्रेशनला बळी पडतात. त्यामुळे मन शांत ठेवायला शिकायला हवं. रोज काही मिनिटं ध्यानधारणा (मेडिटेशन) करावी, चांगली पुस्तकं वाचावीत, सकारात्मक विचार करावा आणि मन हलकं ठेवावं. काही लोक सोशल मीडियावर वेळ घालवून स्वतःची तुलना दुसऱ्यांशी करतात आणि नकारात्मकता वाढवतात. पण त्यापेक्षा आपलं आयुष्य चांगल्या पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करावा.

झोपही तितकीच महत्त्वाची आहे. अपुरी झोप म्हणजे अनेक समस्यांना निमंत्रण. रात्री उशिरा झोपायचं, सकाळी लवकर उठायचं, झोप कमी करायची ही सवय शरीरासाठी हानिकारक आहे. झोप नीट न झाल्यास थकवा येतो, चिडचिड होते आणि कामात लक्ष लागत नाही. रात्री उशिरा मोबाईल किंवा टीव्ही पाहणं टाळावं, झोपण्याआधी हलकं वाचन करावं, शांत संगीत ऐकावं, त्यामुळे झोप चांगली लागते.

निसर्गात वेळ घालवणंही आरोग्यासाठी चांगलं असतं. सकाळच्या वेळी ताजी हवा, झाडं, हिरवळ पाहिली की मनाला प्रसन्न वाटतं. रोज सकाळी मोकळ्या हवेत फिरायला जावं, झाडं लावावीत, त्यांची काळजी घ्यावी. हे सगळं केल्याने मनाला शांतता मिळते आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

स्वतःसाठी वेळ देणं म्हणजे स्वार्थीपणा नव्हे. उलट, हे आपल्या भल्यासाठी आहे. आरोग्य चांगलं असेल, तरच आपण आपली जबाबदारी नीट पार पाडू शकतो. अनेक लोक कामाच्या व्यापात स्वतःकडे दुर्लक्ष करतात आणि नंतर त्रास सहन करावा लागतो. म्हणूनच रोजच्या वेळापत्रकात थोडा वेळ स्वतःसाठी राखून ठेवणं आवश्यक आहे.



**प्रविण जरीचंद माळवदे**
मो नं –८६०५५३११९९
धाराशिव

आजच्या धावपळीच्या आयुष्यात थोडा वेळ स्वतःसाठी द्या. निरोगी शरीर आणि आनंदी मन हवं असेल, तर आहार, व्यायाम, झोप आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष द्या. पैसा, प्रसिद्धी, यश यापेक्षा आरोग्य सर्वात महत्त्वाचं आहे. आयुष्यभर आनंदी आणि निरोगी राहायचं असेल, तर आजपासून स्वतःसाठी वेळ द्यायला सुरुवात करा.

# क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला

ज्यांचे क्रीडा विषयक लेख वाचत मी लहानाचा मोठा झालो. ज्यांच्या लेखाने माझे क्रिकेट विश्वातील ज्ञान वृद्धिंगत झाले. ज्यांच्या लेखणीतून प्रेरणा घेऊन मी क्रीडा विषयक लेख लिहू लागलो असे ज्येष्ठ क्रीडा समीक्षक, लेखक, स्तंभलेखक द्वारकानाथ संझगिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी गुरुवारी ( ६ फेब्रुवारी ) रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा क्रीडाविश्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते त्या संदर्भात त्यांनी एक फेसबुक पोस्ट देखील लिहिली होती मात्र ते असे इतक्या लवकर जातील असे वाटले नव्हते. शालेय जीवनात असतानाच द्वारकानाथ संझगिरी हे नाव तोंडपाठ झाले होते. भारतीय संघाचा क्रिकेट सामना असला की त्या दिवशी सकाळी आणि क्रिकेट सामना संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सामन्यावर विश्लेषण करणारे वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचणे हा माझा आवडता उद्योग. त्यांचे क्रिकेट वरील ज्ञान तर अफलातूनच होते. सध्याच्या क्रिकेटवर भाष्य करतानाच ते आपल्याला भूतकाळात घेऊन जात अगदी पन्नास वर्षांपूर्वीच्या सामन्याचा किंवा खेळाडूंचा संदर्भ त्यांच्या लेखात असे. त्यांचा इतके क्रिकेटचे ज्ञान असलेले लेखक विरळच. केवळ वर्तमानपत्रातच नाही तर दूरचित्रवाणीवर देखील ते क्रिकेटचे समीक्षण करत. जवळपास पाच दशके क्रिकेटवर लेखन करून क्रिकेटप्रेमींना नवी दृष्टी देणाऱ्या द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईतील दादर येथे झाला. मुंबईत शालेय शिक्षण घेतल्यावर त्यांनी माटुंग्याच्या व्हिक्टोरिया ज्युबली कॉलेजमधून इंजिनीरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इंजीअरिंग केल्यावर त्यांनी मुंबई महापालिकेत अभियंता म्हणून नोकरीही केली पण क्रिकेट व साहित्यातील रूचीमुळे त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला. क्रिकेटवर त्यांनी केलेले लेखन विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या लिखाणाला क्रिकेटप्रेमींनी नेहमीच पसंतीची दाद दिली. केवळ मराठीच नाही तर इंग्रजी आणि हिंदी दैनिकातून आणि साप्ताहिकातूनही ते लिहू लागले. त्यांनी अनेक क्रीडापटुंच्या मुलाखती घेतल्या. क्रीडापटुंची मुलाखत घेण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. ते क्रीडापटुंची मुलाखत घेत आहेत असे वाटतच नव्हते त्यांची मुलाखत म्हणजे गप्पांचा कार्यक्रमच वाटत असे इतके मनमोकळेपणे क्रीडापटू त्यांच्यापुढे व्यक्त होत. केवळ क्रिकेट किंवा क्रीडाविषयकच नव्हे तर चित्रपट, प्रवास, पर्यटन आणि सामाजिक विषयांवर देखील त्यांनी विपुल लेखन केले . द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून २०११ पर्यंत झालेल्या सर्व क्रिकेटच्या विश्वचषकांचे त्या देशात जाऊन वार्तांकन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेटर्स आणि चित्रपट तारे तारकांवर अनेक कार्यक्रम केले. त्या कार्यक्रमाच्या निवेदनाची धुरा तेच सांभाळीत. द्वारकानाथ संझगिरी यांनी जवळपास ५० पुस्तके लिहिली. त्यातील शतकात एकच सचिन, चिरंजीव सचिन, दिलखुलास बातचीत क्रिकेटपटूंशी, खेलंदाजी, बोलंदाजी, चॅम्पियन्स, चित्तवेधक विश्वचषक २०२३, क्रिकेट कॉकटेल, क्रिकेट वर्ल्डकप हाय लाईट, कथा विश्वचषकाच्या, लंडन ऑलिम्पिक, पॉवर प्ले, स्टंप व्हिजन, संवाद लिजेंडशी, क्रिकेट गाथा, थर्ड अंपायर, इंग्लिश ब्रेकफास्ट ही त्यांची पुस्तके क्रीडाप्रेमींना खूप आवडली. द्वारकानाथ संझगिरी यांना अनेक पुरस्कार मिळाले त्यात दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखक पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार, क्रीडाविषयक लेखनासाठी विश्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या निधनाने क्रीडाविश्वासह साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे विविधांगी लेखन कायम स्मरणात राहील. स्तंभलेखक, समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# सामान्य ध्येयवादी माणसाचं प्रतिबिंब : काठावरची माणसं

सन्मित्र डॉ. संदीप तपासे यांचा पहिलावहिलाच काठावरची माणसं हा तीस कथांचा कथासंग्रह नुकताच ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या हस्ते प्रकाशित झाला. तरीसुद्धा कथा एखाद्या सिद्धहस्त कथाकारासारख्या असून कथेचे कथानक, विषय, भाषाशैली, संवाद, संस्कार आणि वास्तववादी हे दर्जेदार विशेष आहेत. द.मा. मिरासदार, आंनद यादव, योगीराज वाघमारे, यांच्या प्रभावातून निर्माण झालेली डॉ. तपासे यांचा 'काठावरची माणसं' कलाकृती, त्याचा सामान्य माणूस केंद्रबिंदू असून पांढरपेशा संस्कृती, परंपरा, लोकजीवन, जीवन जगण्यातून निर्माण झालेले स्नेहबंध आणि कटूबंधाचा काठ असणाऱ्या सर्व सामान्य ध्येयवादी माणसांच्या भावविश्र्वाचे प्रतिबिंब चित्रित केले आहे. 'काठावरची माणसं' वेगळेपण : या कथासंग्रहात या शीर्षकाची कथा समाविष्ट असणे प्रचलित सूत्र परंतु अशी कथा यांत नाही, असे अनोखे वैशिष्ट्य आहे. तसेच कथेतील माणसे कुठल्या एखाद्या नदीच्या काठावर रहिवाशी असावीत असे भाकीत इथे घडत नाही, मात्र 'काठ' (किनारा) या दोन शब्दात विलक्षण अर्थ दडलेला आहे. आधुनिक शहर व गावखेडे असे दोन भागाची सीमारेषा अपेक्षित असावी, असे वाटते. त्या सीमेवर उभ्या असलेल्या सामान्य माणसाचे भावचित्रणाचा आकृतिबंध साकारला आहे. नात्यांची गुंफण, अधुरी कहाणी, अशी ही एक लढाई, सी.एच.बी., गावचा लखोबा,बाप आठवताना आणि शंभरची नोट या कथा विशेष चिंतनगर्भ आहेत.





गुणात्मकदृष्टया काठावरचा विद्यार्थी असतो, तसा कथेतील माणूसही व्यावहारिक समाधानाच्या काठावरचाच असल्याचे जाणवते. यातील पात्रांनी आपल्या जन्मभूमीतील मातीशी नाळ जोडलेली परंपरा, सण–उत्सव, जत्रा यात्रा, जागरण, गोंधळ, काकड आरती, भजन, कीर्तन, पारायण आणि सप्ताह याद्वारे तनामनाचे भरणपोषण करणाऱ्या ग्रामीण परंपरांचा काठावरच्या माणसांना विसर पडत आहे, दिवसेंदिवस मतभेदांचे रुपांतर मनभेदात होत असल्याचे सूचन करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाला संशोधन विषयाचे तंत्र व मंत्र अवगत असल्याने प्रत्येक कथेतील पात्रांना पांढरपेशी झालर पांघरून आपला भूतकाळ विसरत, एका विशिष्ट चौकटीत चाकोरीबद्ध जीवन जगण्यात त्यांना यश आले आहे. 'घरोघरी मातीच्या चुली' प्रमाणे चार भिंतीत घुमणारा वाद–संवादातून निर्माण झालेले भावतरंग, सुख–दुःख, गुण–दोष, नात्यातला कडू–गोडपणा, चाकोरीबद्ध चाकरी, अपत्यांकडून केलेल्या अपेक्षांची परिपूर्ती अथवा मोडतोड, तारुण्यसुलभ प्रकृतीतून भिन्नलिंगी जिवांची झालेली जवळीक, प्रेमविवाह वितंडवादातून झालेले घटस्फोट, त्यातून आलेले व्यसनाधिनता आणि नैराश्य इ. गुणवैशिष्ट्यांच्या आकृतिबंधातून कथेचा जन्म झाला आहे. प्रेमविवाह करताना जाती–धर्माच्या मर्यादा ओलांडून या पांढरपेशी मानवाने सर्वधर्मसमभाव प्रत्यक्ष कृतीतून जोपासल्याचे दिसून आले आहे. 'केल्याने देशाटन पंडित मैत्री, सभेत संचार यामुळे मनुजा चातुर्य येतसे फार' याप्रमाणे सांस्कृतिक उत्सव अशा विविध लोकसोहळ्यामध्ये हा माणूस रमत नाही. आजकाल माणूस प्रॅक्टिकली जीवन जगत असत असून अध्यात्मभावाचा अभाव, म्हणजेच निसर्गाशी नात, परमेश्र्वराची प्रार्थना यांच्याकडे दिसत नाही. सिमेंट कॉंक्रीट व यंत्रयुगात तो पुरता जखडून गेला आहे.

यामुळेच या काठावरच्या माणसाची 'किती तरी दिवसांत नाही, चांदण्यात गेलो' यासारखी कवी बा.सी.मर्ढेकरांनी व्यक्त केलेली खंत व बोथट झालेली दिसते. काठावरचा माणूस डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, राजकारणी, मॅनेजर, कामगार, शेतमजूर, व्यावसायिक याबरोबरच इ.भूमिकेतून प्रतिबिंबित झालेला दिसतो. काही माणसे शून्यातून उभी राहणारी, तर काही परेश हिरानंदानीसारखी शून्यात जगणारी, काही तत्त्वनिष्ठ शिक्षक असूनही सहकाऱ्यांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक सहन होता शिक्षक वसा बासनात गुंडाळून, विद्यार्थ्यांना सापत्नभावाची वागणूक देऊन चोरावर मोर होणारी, काही धनाजीसारखे मस्त कलंदर, काही कष्टकरी, शेतकरी, तर काही प्रत्येक गोष्टीत राजकारण करणारे बदमाश, काही उच्चपदस्थ असूनही व्यवहारज्ञानाच्या अभावाने जीवनात अपयशी, काही प्रामाणिक चाकरमानी परंतु अपत्यांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे प्रपंचात पराभूत, काही तारुण्यसुलभयौवनातून निर्माण झालेले निष्ठावंत, परंतु हंगामी प्रेमवीर, तर काही प्रकृती दोषातून निर्माण झालेल्या दुराव्यातून वैफल्यग्रस्त. अशा अनेक आशयांनी व विषयांनी शृंगारीत झालेली ही काठावरची माणसं नेमकी आहेत तरी कशी? त्यातील घटना व प्रसंग कोणते आहेत? प्रत्येक कथेचा समारोप तरी कसा झाला आहे? प्रत्येक कथेतून आपणास शिकवण तरी कोणती मिळते? यांसारख्या अनेक प्रश्र्नांची उत्तरे आपणास कथासंग्रह वाचूनच मिळवावी लागतील. काठावरल्या माणसांची कठोर परिश्रम करण्याची तयारी, दुर्दम्य इच्छाशक्ती, ध्येयवेडेपणा, महत्वाकांक्षा, तत्त्वनिष्ठता, प्रामाणिकपणा आदी सात्त्विक गुणांची जपणूक करताना त्याचे जन्मभूमीकडे झालेले दुर्लक्ष, अध्यात्मवादाचा विसर, स्वतःच स्वतःभोवती आखलेल्या वर्तुळाचा संकुचित परीघ, स्वतःच डळमळीत केलेली कुटुंबव्यवस्था व विवाहसंस्था, जगावे तरी कसे? याविषयीचा काहींचा अनभिज्ञपणा, थोरामोठ्यांच्या आणि वृद्धांच्या जबाबदारी संदर्भातील निष्काळजीपणा, केवळ चाकरमानी वृत्तीतून अपत्यांच्या सर्वांगीण विकासाकडे झालेले दुर्लक्ष, कामचोर व लबाडवृत्ती इ. रजतमसत्व गुणांची सोडवणूक करण्याची समज वाचकाला मिळाली तर ती या कथासंग्रहाची फलित ठरेल.



**प्रा. दीपक सूर्यवंशी**
प्राध्यापक – संशोधक मार्गदर्शक
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब मो.–९४२०९५८६९९

बुद्धभूषण साळवे यांचे आकर्षक, अर्थगर्भ मुखपृष्ठ : बुद्धभूषण साळवे यांनी संबंधित कथासंग्रहाचा सूक्ष्म अभ्यास करून प्रत्येक कथेतील मातीत मळलेल्या माणसाने प्रामुख्याने पाठ फिरविल्याने मुखपृष्ठावरील खेड्याची वाट अंधारली होऊन काळोकुद्ध झाली आहे. शहरातील सिमेंट कॉंक्रीटच्या अति उंच इमारती, त्यातून जोपासलेला अतिरेकी आधुनिकतावाद व दिव्यांच्या झगमगाटाने डोळे दिपून गेले, प्रत्येक उंबरठ्याला पडलेली भुरळ यांचेच या माणसाला आकर्षण वाटते. म्हणूनच शहरात आपली जीवनपहाट तांबडकेशरी होऊ शकेल या आशावादाने मनाने काठावर थांबून त्याने शहराची वाट धरली आहे. यासाठीच मुखपृष्ठावरील अर्धा शहरी भाग लाल केशरी रंगाने प्रकाशमान केला आहे . तसेच मुखपृष्ठकाराने 'काठावरची माणसं' या शीर्षकाला टोप्या न पालता बोडखे ठेवले आहे. प्रभाकर तांडेकर यांची दिशादर्शक पाठराखण : लेखकाचे संवेदनशील मनोगत, डॉ. शिवाजी काळे यांची अभ्यासपूरक प्रस्तावना, मलपृष्ठावरील प्रभाकर तांडेकर यांची नेमक्या शब्दात पाठराखण, याबाबी अगोदरच न वाचता थेट कथासंग्रह वाचता तर वाचकालाही आपले मनोगत वस्तुनिष्ठपणे मांडता येते. भविष्यात लेखकाकडून काठावरच्या माणसांबरोबरच उपेक्षित माणसांचे जीवन अधोरेखित व्हावे, त्यांच्या पुढील साहित्यिक प्रवासास हार्दिक शुभेच्छा .

**कथासंग्रह** : **काठावरची माणसं**
**कथाकार** : **श्री संदीप तपासे**
**प्रकाशक** : **ललित पब्लिकेशन, मुंबई**
**मुखपृष्ठ** : **बुद्धभूषण साळवे**
**पृष्ठ** : **१४६**
**मूल्य** : **१७०/–**

# बाजार हाटच्या माध्यमातून मुलांनी उलगडले भाजी पाल्याचे महत्त्व



## तेर येथील स्पेशल शाळेत भरला बाल आनंद मेळा

**आरंभ मराठी । तेर**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या (स्पेशल) विध्यार्थ्यांनी खरी कमाई संकल्पना राबवीत बाल आनंद मेळाव्यात भाजीपाला, खाद्यपदार्थ व स्टेशनरी वस्तूचा शुक्रवारी (दि.७) बाजार भरवला. या आनंद मेळाव्याचे उदघाटन शा.व्य.समितीचे अध्यक्ष अमोल थोडसरे, उपाध्यक्ष नामदेव कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पहिली ते चौथी पर्यतंच्या मुलां मुलीनी यात सहभाग घेतला होता. यावेळी विध्यार्थ्यानी खाद्यपदार्थ, भाजीपाला विकण्यासाठी ठेवले होते. या माध्यमातून मुलांना बाजाराची ओळख व्हावी, त्यांना ज्ञान मिळावे या हेतूने बालआनंद मेळावा भरविण्यात आला होता. या बाजारहाट मधून मुलांनी आनंद घेतला. यावेळी अनेक नागरिकांनी विध्यार्थी व विध्यार्थिनीकडून खाद्यपदार्थ, भाजीपाला, स्टेशनरी वस्तू खरेदी केल्या. यावेळी तब्बल ३५ हजार रूपयांची उलाढाल झाली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक उतरेश्र्वर राऊत, तानाजी मारवटकर, श्रीमती. शिंदे एम.एन., नागलबोने एस.डी., श्रीमती.जे.डी देवारे, श्रीमती.ए.बी धुमाळ, श्रीमती के.एम निकम, श्रीमती.ए.ए. देशमुख, श्रीमती. जे.आर पाचभाई, डी.ए.कांबळे इत्यादींनी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांना गणित सोप्या पद्धतीने समजण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा

## आदित्य पाटील यांचे मत



**आरंभ मराठी । धाराशिव**

विद्यार्थ्यांना गणित विषय सोप्या भाषेत समजण्यासाठी शिक्षकांनी प्राजेक्ट, क्विज, सेमिनारसारखे उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील यांनी केले आहे. श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये ११ वी विज्ञान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणित प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी आदित्य पाटील बोलत होते. यावेळी प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उप प्राचार्य संतोष घारगे, मार्गदर्शक प्रा. ज्योती शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. गणित प्रकल्पाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी विद्यार्थ्यांनी गणित पार्क, गणितीय घड्याळ, फॅक्टर ट्री आलेख आदी विविध प्रकल्पाच्या सहाय्याने विविध गणितीय सज्ञा सोप्या पध्दतीने सादर केल्या.निलोफर शेख या विद्यार्थिनीने गणित पार्क, शौर्य धोंगडे या विध्यार्थ्याने वर्ग व वर्ग मुळ, विभाजक सांगणारा प्रकल्प सादर केला. डेरिवेटिव्ह, त्रिकोणमीतीचे सुत्र दाखवणारे घड्याळ लक्षवेधी ठरले. यावेळी आदित्य पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, प्रश्र्न विचारून सादर केलेल्या प्रकल्पाविषयी माहिती घेतली. सहभागी विद्यार्थ्यांचे आदित्य पाटील यांनी कौतुक केले. यावेळी सुभान देशमुख, निखिल साळुंके तौहीद पठाण, शताब्दी जमदाडे, अंकिता जमाले, ज्ञानेश्र्वरी चव्हाण, वैष्णवी फुटाणे प्रतिक्षा फुटाणे आदी ११ वी विज्ञान वर्गातील ३० – ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. गणित प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

## गणित पार्क, गणितीय घड्याळचे आकर्षण

यावेळी समृध्दी कराळे या विद्यार्थीनीने कोणाचे विविध प्रकार, वर्तुळाची त्रीज्या, जीव्हा, छेदिका, पायथागोरसचे प्रमेय आदि विविध सज्ञा स्पष्ट करणारे गणित पार्क सादर केले होते. अस्मिता ढेकळे या विद्यार्थिनीनी सेन्सरच्या सहाय्याने वस्तुचे अंतर मोजण्याचा प्रकल्प विद्यार्थ्यांसाठी आकर्षण ठरले.

# येरमाळा येथील आनंद मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**आरंभ मराठी । येरमाळा**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत येरमाळा बीट अंतर्गत गुरुवारी (दि.६) येरमाळा येथील आनंदधाम सभागृहामध्ये पालक आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी येरमाळ्यासह पंचक्रोशीतील पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बालकांना सुदृढ बनविण्याच्या दृष्टिकोनातून बालकांना तसेच कुटुंब व समुदायाचे सक्षमीकरण व शून्य ते तीन वर्षे बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी टप्पा २ अंतर्गत बाळ दोन वर्षाचे होईपर्यंत त्याच्या मेंदूच्या विकासासाठी मातेला आवश्यक







आहार द्यावा, बाळाच्या जन्मापासून ते दोन वर्ष पूर्ण होईपर्यंत बाळास कोणता आहार द्यावा, मनोरंजनाची साधने कोणती असावी, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी ताई बोराडे, संगीता सावंत, अनिता थोरात, सरपंच प्रिया बारकुल, अनुपमा बोरफलकर, येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ श्री संदीप तांबारे, डॉ पल्लवी तांबारे यांच्यासह येरमाळा बीट आशा कार्यकर्ती अंगणवाडी सेविका, मदतनीस ग्रामस्थ महिला, पालक, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरख बारकुल यांनी केले तर आभार पवार मॅडम यांनी मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# कौडगाव एमआयडीसीत उद्योजकांना अनुदानासह मिळणार सुविधा

**टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी वस्त्रोद्योगमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय**

**आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती**



आरंभ मराठी । धाराशिव

कौडगाव एमआयडीसीत होवू घातलेल्या टेक्निकल टेक्स्टाईल पार्कमध्ये उद्योग उभारण्यासाठी इच्छुक उद्योजकांना राज्य सरकारच्या खास धोरणांचा मोठा लाभ होणार आहे. भरीव आर्थिक अनुदानासह मूलभूत सोयी-सुविधा, व्याज अनुदान, कर परतावा अशा विविध सवलती दिल्या जाणार आहेत. राज्य सरकारने त्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून देशातील नामांकित निर्यातदार कंपन्यांना गुंतवणुकीसाठी आमंत्रित करण्याबाबत वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी निर्णायक भूमिका घेतली आहे. त्यामुळे दहा हजार रोजगार निर्मितीचे पहिल्या टप्प्यातील उद्दिष्ट आता सुकर झाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मंगळवारी वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांच्या मंत्रालयातील दालनात यानुषंगाने बैठक घेण्यात आली.यावेळी वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती अंशु सिन्हा, एमआयडीसीचे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कौडगाव टेक्निकल टेक्स्टाईल पार्कमध्ये परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी उद्योजकांना सुविधा देण्याबाबत धोरण निश्र्चित करण्यात आले व त्यासाठी उपाययोजना करण्याचे ठरले.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती करणारे निर्यातदार उद्योजक आपल्या जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी यावे यासाठी आपण सतत प्रयत्न केले. त्याला राज्य सरकारच्या माध्यमातून आता बळ मिळत आहे. कौडगाव एमआयडीसीमध्ये सर्वार्थाने मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत. विमानतळ, रेल्वेमार्ग, राष्ट्रीय महामार्ग, उजनी जलाशयातून आलेली जलवाहिनी, रिलायन्स गॅस पाईपलाईन त्याचबरोबर याठिकाणी ५० मेगावॅट क्षमतेचा सोलार प्रकल्प यापूर्वीच कार्यान्वित झाला आहे. त्यामुळे देशातील मोठे उद्योजक आपल्या जिल्ह्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत. धाराशिव एक शांत, विकासाभिमुख आणि उद्योग पूरक शहर आहे. याठिकाणी गर्दी, गुन्हेगारी, प्रदूषण अजिबात नाही. कुशल।मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. स्थानिक अर्थकारणाला या उद्योगांमुळे मोठी गती मिळणार आहे. गावाजवळ हक्काचे रोजगार उपलब्ध होणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्येही मोठी सहकार्याची भावना आहे. या सगळ्या बाबींचा अभ्यास करून जागतिक पातळीवरील निर्यातदार उद्योजक शोधण्याचे आणि त्यांना कौडगाव एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून निमंत्रित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांनी घेतला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## गुंतवणूकदारांना या सुविधा मिळतील

धाराशिव जिल्हा वस्त्रोद्योगाच्या दृष्टीने झोन क्रमांक २ मध्ये येतो. त्यामुळे शासनाच्या धोरणानुसार कौडगाव एमआयडीसीत गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना स्थिर भांडवली गुंतवणुकीसाठी ४० टक्क्यांपर्यंत आर्थिक अनुदान, मोठ्या उद्योगांना ३५ टक्क्यांपर्यंत तर विशाल अर्थात मेगा उद्योगांसाठी अनुदानाची हीच तरतूद ५० टक्के किंवा जास्तीतजास्त २२५ कोटी रुपये यापैकी जे कमी असेल इतकी भरीव रक्कम अनुदान मिळणार आहे. दहा हजार रोजगार निर्मितीच्या दृष्टीने आपण मागील अनेक वर्षांपासून सुरू केलेल्या प्रयत्नाला आता खऱ्या अर्थाने यश येऊ लागले आहे. राज्य सरकारच्या वतीने एमआयडीसीच्या माध्यमातून हा देशातील पहिला विशेष तांत्रिक वस्त्रोद्योग प्रकल्प आपल्या जिल्ह्यात उभारण्यात येणार आहे. ज्या १५ महत्वपूर्ण प्रकल्पांवर आपण सातत्याने परिश्रम घेत आहोत त्यापैकीच कौडगाव एमआयडीसीमधील तांत्रिक वस्त्रोद्योग प्रकल्प हा एक असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

---

## विविध वृत्त...

### आई वडीलांच्या कष्टाची जाणिव ठेऊन परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना यश निश्चित : प्रा. डॉ. अविनाश ताटे




आरंभ मराठी । धाराशिव

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित श्री रामानंद महाराज विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय काजळा येथे बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी तेरणा महाविद्यालय धाराशिव ,मराठी विभागातील प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. अविनाश ताटे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. तसेच आजच्या विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, मासाहेब जिजाऊ, माता रमाबाई, सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचे वाचन करून जीवन नक्कीच यशस्वी करता येते असे सांगितले. त्याच बरोबर योग्य ध्येय, योग्य मार्गदर्शन, आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर यश प्राप्त करता येते यांसंदर्भात अनेक किर्तीवान व्यक्तीची दाखले देऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य .श्री.शिवाजी वागतकर सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक श्री. मालोजी पवार यांनी तर सुत्रसंचलन . कु. आसावरी मगर व कु. सिध्दी पंडित यांनी केले. तसेच आभार श्री. आर. डी. पवार सरांनी मांडले. कार्यक्रम प्रसंगी सर्व विद्यार्थी, शिक्षक, आणि शिक्षकेत्तर कृमचारीवृध्द उपस्थित होते

### साकत (खु) जि.प शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात




आरंभ मराठी । अनाळा

परंडा तालुक्यातील साकत खु येथील जि.प.शाळेत वार्षिक स्नेहसंमलन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच विनायक देवकर, उपसरपंच चांगदेव हुके, शालेय समिती चे अध्यक्ष सुधीर कल्याणकर, उपाध्यक्ष संभाजी शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आले . या कार्यक्रमात लावणी, लोकगीते, कोळीगीते, हिंदी -मराठी चित्रपटातील गीते, कोळीगीते, विनोदी उखाणे, विनोदी नाटीका सादर करून शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी ने प्रेक्षकांची मने जिकली. हा कार्यक्रम जवळपास तीन तास सुरु होता. कार्यक्रमास परिसरातील साकत बु, पिस्तमवाडी, रोहकल आदी गावातील महिला - पुरुषांनी मोठी गर्दी केली होती. या जोरदार गितांच्या कार्यक्रमात बक्षीसांचा ही मोठा वर्षाव झाला. वार्षिक स्नेह संमेलनात जवळपास साठ हजार रुपये बक्षीस प्रेक्षकांनी शाळेला लोकवाटा स्वरूपात दिला. कार्यक्रमास केंद्रप्रमुख संजीव मुसळे, माजी सरपंच अंकुश देवकर , माजी उपसरपंच राम यादव, प्रकाश गायकवाड, फिरोज शेख, ज्ञानेश्वर हुके, ग्रा.प सदस्य शाहू लोंढे, गोकुळ गायकवाड आदिची प्रमुख उपस्थिती होती. विदयार्थी - विद्यार्थानीची उत्कृष्ठ व आकर्षक वेषभुषा करण्यासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी रेश्मा काझी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवाजी वाघमारे यांनी केले तर उत्कृष्ठ दिग्दर्शन अण्णासाहेब साळूंखे यांनी केले.

### परंडा तालुक्यातील शिधा पत्रिका धारकांनी ई-केवायसी मुदतीत करून घ्यावी; तहसीलदार निलेश काकडे

आरंभ मराठी । परंडा



परंडा तालुक्यातील सर्व शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी मुदतीत करुन घ्यावी असे आवाहन तहसीलदार निलेश काकडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत् अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना अंतर्गत शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानीत अन्न धान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी कुटुंबातील रेशनकार्ड मध्ये नोंदणी केलेल्या सर्व सदस्यांची ई-केवायसी मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. ज्या सदस्यांची ई-केवायसी पूर्ण होणार नाही त्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे,असे निर्देश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मार्फत देण्यात आले आहेत. परांडा तालुक्यातील शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांची ई-केवायसी करण्यासाठी दिनांक ८ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीमध्ये गावातील रास्तभाव धान्य दुकानात रेशन दुकानदार यांच्या मार्फत ई-केवायसी करण्याकरीता कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी परांडा तालुक्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी रेशनकार्ड मधील सर्व सदस्यांची ई-केवायसी करून घ्यावी. जेणेकरून आपल्याला मिळणा-या अन्नधान्याचा लाभ बंद होणार नाही,असे आवाहन तहसीलदार निलेश काकडे यांनी केले आहे.

### नाशिकमधील नामवंत बिल्डरच्या घरावर गोळीबार अन् दगडफेक; परिसरात थरार, हल्लेखोर फरार

आरंभ मराठी । नाशिक

गेल्या काही दिवसांपासून नाशिकमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. सावतानगर परिसरात तडीपार गुंडांनी हातात कोयते घेऊन दहशत माजवल्याची घटना ताजी असतानाच नाशिकमध्ये आणखी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शहरातील एका नामवंत बिल्डरच्या घरावर गोळीबार आणि दगडफेक करण्यात आल्याने नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## तेर येथील शिवनृसिंह शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या अध्यक्षपदी अविनाश इंगळे तर पांगारकर उपाध्यक्ष

आरंभ मराठी । तेर





धाराशिव तालुक्यातील तेर येथील शिवनृसिंह शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या अध्यक्षपदी अविनाश इंगळे तर उपाध्यक्ष म्हणून मंगेश पांगरकर यांची निवड करण्यात आली. जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दिनांक १९ फेब्रुवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त तेर येथील नृसिंह वेस मधील शिवनृसिंह शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे नव्याने गठण करण्यात आले आहे.

यावेळी समितीच्या अध्यक्षपदी अविनाश इंगळे, उपाध्यक्षपदी मंगेश पांगरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी तुषार बुके, मिरवणूक प्रमुख पाहुणे अभिषेक लामतुरे यांची निवड करण्यात आली. यावेळी शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित् १९ फेब्रुवारी रोजी मुर्ती स्थापना व फळे वाटप,२० फेब्रुवारीला विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, २२ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर २३ फेब्रुवारी रोजी गावातून भव्य मिरवणूक निघणार आहे. यावेळी अक्षय कोळपे, धिरज पांगरकर, अमोल पांगरकर, गोपाळ इंगळे, विजय खोटे, सिद्धेश्वर शिराळ, धिरज शिराळ, निखिल पांगरकर, गणेश उटगे, वैभव वैरागकार, सुरज पांगरकर, महेश गाढवे, अमन कोळपे, किशोर गाढवे, ओंकार शिराळ, अविनाश माने,गजानन मांजरे, सुधीर पांगरकर,धिरज माने, वैभव बडवे,सौरभ इंगळे, सुरज पांगरकर, सुधीर पांगरकर,हर्षद इंगळे, रोहन माने, अनिकेत इंगळे, गणेश इंगळे,रोहन इंगळे,राहुल इंगळे, रोहित गाढवे, रोहन गाढवे, रोहित माने, इत्यादी शिवप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते.

## परंडा येथे दिव्यांग तपासणी शिबिरात ४५ दिव्यांग नागरिकांची तपासणी

आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे व तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्य अध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा येथे शुक्रवारी (दि.७) दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले. जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा यांच्या वतीने हा कॅम्प यशस्वी पार पाडण्यात आला.

या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग , मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण ४५ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉ. ज्योती कल्याणी, डॉ आयुश शिंदे, डॉ खंडागळे यांनी कामकाज पाहिले. हा



कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योगसमूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, शहराध्यक्ष गोरख देशमाने, सरपंच कार्ला संतोष भुजे, सामाजिक कार्यकर्ते कानिफनाथ सरपने, शिक्षण विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कामकाज पाहणारे कर्मचारी हाजगुडे, जाधव यांनी सहकार्य केले.

## कळंब मधील विद्याभवन हायस्कूल येथे रोटरीतर्फे मोफत डिजिटल क्लासरूम

आरंभ मराठी । कळंब

रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्याभवन हायस्कूल, कळंब येथे मोफत डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध: ४३ इंच आकाराचा स्मार्ट टीव्ही, महाराष्ट्र राज्य मंडळाचा ५ वी ते १० वीचा अभ्यासक्रम (मराठी व इंग्रजी) ऑडिओ - व्हिज्युअल स्वरूपात,




विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारी, MS-CIT, करिअर मार्गदर्शन, इंग्रजी कौशल्य विकास व विविध शैक्षणिक सामग्रीसह डिजिटल सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. ग्रंथालय पूरक अध्ययन सामग्री, स्वच्छ भारत आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण यावर आधारित माहितीपट, एकलव्य स्पर्धा परीक्षांसाठी ५००० प्रश्नसंच (मराठी), ICT, MS-CIT अभ्यासक्रम (मराठी), करिअर दिशा, करिअर मार्गदर्शन व्हिडिओ (मराठी, हिंदी, इंग्रजी), सॉफ्ट स्किल्स आणि व्यवस्थापन प्रशिक्षण इत्यादी अभ्यासक्रम यामध्ये आहे. यासाठी सोलापूरहून रोटरी टीमचे पदाधिकारी शाळेत डिजिटल क्लासरूमचे इन्स्टॉलेशन पूर्ण करण्यासाठी आले होते. ही सुविधा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाच्या डिजिटल क्रांतीसारखी ठरेल. या उपक्रमासाठी सीएसआर, पी.पी. पटेल कंपनी आणि डीजीएन जयेश पटेल प्रांतपाल यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे अध्यक्ष रोटे. अरविंद शिंदे, सचिव अशोक काटे, सुशील तीर्थकर, डॉ.गिरीश कुलकर्णी, डॉ.सचिन पवार , निखिल भडंगे तसेच रोटरी सोलापूर परिवाराचे रो. राजन वोरा व रो.अक्षय जव्हेरी उपस्थित होते. रोटरी च्या शिक्षणासाठी सेवा या संकल्पनेअंतर्गत डिजिटल शिक्षणाची ही महत्वपूर्ण भेट विद्यार्थ्यांना नवे ज्ञान व संधी उपलब्ध करून देईल.

## जयाद्री ग्रामदेवता शक्तीपीठ जाणाईदेवी मंदिराचे काम पूर्णत्वास

**जेजुरीकरांच्या श्रद्धाभक्ती शक्तीपीठ उभारणीचे ऐक्य दर्शन; प्राणप्रतिष्ठापना सोहळा सुरू**



आरंभ मराठी । जेजुरी

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या म्हाळसाच्या प्रांगणात जेजुरी नगरीची ग्रामदेवता आणि निसर्गपूजा वनदेवी जाणाई देवीच्या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम पूर्णत्वास आले असून, या देखण्या नूतन मंदिरात देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलाशारोहण विधी १६ फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याचा निर्णय जेजुरीकर ग्रामस्थांच्या बैठकीत घेण्यात आला.

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीचे श्रद्धास्थान व जागृत दैवता जाणाई देवीचे मंदिर ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असून, हे मंदिर जीर्ण झाल्याने २०१७ मध्ये जेजुरी ग्रामस्थांच्या वतीने लोक सहभागातून मंदिराच्या जिर्णोद्धारास सुरुवात करण्यात आली. अतिशय रेखीव दगड वापरून भव्य स्वरूपात मंदिर उभारण्यात आले असून या मंदिरासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च करण्यात आले. यासाठी जेजुरीकर नागरिक ,जाणाई देवी भक्त व मोठा वाटा श्री मार्तंड देवसंस्थानने उचलला आहे. देवसंस्थानच्या माध्यमातून सुमारे दीड कोटी रुपये मंदिरासाठी देण्यात आले. जाणाई देवी मंदिराचे काम पूर्ण झाले असून, या मंदिराचे वास्तू पूजन,देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना,मंदिरावर कलश रोहण आदी धार्मिक कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जाणाई मंदिरात ग्रामस्थ मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीनुसार १६ फेब्रुवारी रोजी जाणाई देवीच्या नवीन मूर्तीची जेजुरी शहरातून पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात येणार आहे. १७ फेब्रुवारी रोजी नूतन मंदिराची वास्तू शांत, १८ रोजी गणेश पूजन,नवग्रह पूजन, चंडीयाग,कुमारिका पूजन,१९ रोजी लघुरुद्र,श्री मल्हारी सहस्त्रनाम याग,२० फेब्रुवारी रोजी देवीच्या मूर्तीला स्नान,अभिषेक महापूजा व मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना व कलश रोहन, महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस ग्रामदैवता जाणाई देवी जीर्णोद्धार समितीचे पदाधिकारी सुधीर गोडसे,गणेश आगलावे,रामचंद्र भापकर ,आप्पासाहेब बारभाई, छबन कुदळे,पंडित हरपळे,माणिक पवार,खंडोबा पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,माऊली खोमणे, संतोष खोमणे,रोहिदास माळवदकर, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, अजिंक्य देशमुख, रमेश बयास, रोहिदास कुंभार, रवींद्र जोशी, राजेंद्र पेशवे, सुशील राऊत, शैलेश राऊत, नागू माळी ट्रस्टचे प्रमुख नागनाथ झगडे ग्रामउपाध्ये सेवेकरी, खाडे,बेलसरे,श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे,डॉ.राजेंद्र खेडेकर,पोपट खोमणे,विश्र्वास पानसे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# कळंब येथील इनरव्हिल क्लबच्या पुढाकाराने विविध शाळेमध्ये एच.पी.व्ही. लसीकरण अभियान

**कॅन्सरपासून मुलींचे संरक्षण व्हावे यासाठी प्रयत्न**






आरंभ मराठी । कळंब

कळंब येथील इनरव्हिल क्लबच्या पुढाकाराने कळंब येथील विविध शालेय व महाविद्यालयीन मुली व युवतींसाठी ह्युमन पॅपीलोमा व्हायरस (एचपीव्ही) लसीकरण अभियान सुरू करण्यात आले असून, त्यांना इंडियन मेडिकल असोसिएशन, बाल आरोग्य परिषद व स्त्री आरोग्य परिषद यांचे सहकार्य लाभले आहे. सरव्हाकल कॅन्सर हा आजार एचपीव्ही विषाणूच्या संक्रमणामुळे होतो. उपलब्ध आकडेवारीनुसार सरव्हाकल कॅन्सरमुळे चार पैकी एक महिला दगावते. दर सात मिनिटाला एक महिला मृत्यूमुखी पडते, तर एका वर्षात तब्बल ६७ हजार कॅन्सर ग्रस्त महिलांना प्राण गमवावे लागतात. या आजाराचे जोखमीचे वय ५५ ते ६५ वर्ष असले तरी बहुतेक महिलांना तिशीच्या आसपास याची लागण झालेली असते असे आढळून आले आहे. यासाठी मुलींमधे मासिक पाळी सुरू होण्यापूर्वी जर एचपीव्ही लसीची मात्रा दिली तर जवळ जवळ ९७% पर्यंत त्यांना कॅन्सर पासून संरक्षण मिळते. त्यासाठी लसीकरणाची योग्य वेळ म्हणजे ९ ते १४ वर्षे असुन १२ वर्षे वयापर्यंत जर लस दिली तर खूप चांगले परिणाम दिसून येतात असे प्रयोगाअंती सिद्ध झालेले आहे. दिनांक ६ फेब्रुवारी पासून लसीकरण व जनजागृती अभियाना अंतर्गत सावित्रीबाई फुले प्रशाला येथुन अभियानाची सुरूवात झाली. शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन १३ फेब्रुवारी पर्यंत सर्व मुली व पालकांना या लसीविषयी सविस्तर माहिती देऊन लाभार्थी मुलींची यादी तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर लसीकरणाची तारीख घोषित केली जाणार आहे. सद्यस्थितीत बाजारात एचपीव्ही च्या एका डोससाठी तब्बल ४ हजार रुपये मोजावे लागतात. परंतु या लसीकरण अभियानांतर्गत हीच लस सवलतीच्या दरात म्हणजे प्रती डोस १५०० रु. प्रमाणे उपलब्ध करण्यात आली आहे. लाभार्थींचे दोन गटांमध्ये वर्गीकरण केले असून ९ ते १४ वर्षे एक गट असून त्यांना दोन डोस (० आणि ६ महिने) व १५ ते २६ वर्ष यासाठी तीन डोस (०, २ आणि ६ महिने) ची शिफारस करण्यात आली आहे. ही लस उत्तम प्रतीची असून ती भारतीय बनावटीची आहे व १००% सुरक्षित आहे. धाराशिव जिल्ह्यात कळंब मध्ये ही लस पहिल्यांदाच दिली जात आहे. आपल्या घरातील मुलींना ही लस देऊन तिचे भविष्य सुरक्षित करा असे आवाहन संयोजकांतर्फ करण्यात येत आहे. लसीकरण व जनजागृती अभियानाच्या यशस्वितेसाठी इनरव्हिल क्लब अध्यक्ष डॉ.प्रतिभा भवर, सचिव डॉ.प्रियंका आडमुठे, प्रोजेक्ट चेअरमन डॉ.वर्षा कस्तुरकर, आयएमए अध्यक्ष डॉ. शितल कुंकूलोळ, सचिव डॉ.सत्यप्रेम वारे, बालरोगतज्ञ परिषदेचे डॉ.अभिजित लोंढे, स्त्री आरोग्य परिषदेचे डॉ.शोभा पाटील, डॉ.शिल्पा ढेंगळे, डॉ.दिनकर मुळे, बोर्ड मेंबर्स डॉ. अरुणा गावडे डॉ.प्रियांका जाधवर, डॉ.राजश्री देशमुख, डॉ.दिपाली लोंढे व सर्व इनरव्हिल सदस्य तसेच सावित्री बाई फुले प्रशालेचे प्राचार्य काकासाहेब मुंडे, उप प्राचार्य डॉ. मिनाक्षी भवर, परमेश्वर मोरे व सर्व कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहेत.

# आयटीआयमध्ये शिकलेले शेकडो विद्यार्थी पोहचले देश-विदेशात

## कौशल्यपूर्ण प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना रोजगारासोबतच मिळतोय आत्मविश्वास

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रोजगाराच्या प्रश्नावर मात

**शाम जाधवर । आरंभ मराठी**

**कळंब - कळंब येथील संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील तरुणांच्या भविष्यातील रोजगाराचा प्रश्न मिटवण्याची कामगिरी केली आहे. आज देशात आणि राज्यात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला असताना विद्यार्थ्यांना कौशल्यप्रविन बनवून त्याला स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्य प्रशिक्षणा सोबतच आत्मविश्र्वास देण्याचे काम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे. प्रशिक्षण संस्थेतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी आज रोजगार मिळवण्यात यशस्वी होतोय. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्र्न औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे सोडवला जात आहे.**





कळंब येथील तांदुळवाडी रोडवर १९ एकर परिसरात सन १९९६ रोजी बांधलेली संस्थेची सुसज्ज प्रशासकीय इमारत, कार्यशाळा, २०१९ मध्ये बांधलेले १०० मुलांचे वसतिगृह, त्यासमोर घनदाट वन, सोबतच समोर सुरु असलेले गार्डनचे काम कळंबच्या शोभेत, रोजगार विकासात भर पाडत आहे. विविध कोर्सेसचे हे प्रशिक्षणार्थी राज्य आणि देशाच्या कानाकोपऱ्यात स्वयंरोजगार तसेच नौकरीच्या माध्यमातून कळंब तालुक्याचे नांव गाजवत आहेत. मागील ५ वर्षांचा आढावा घेतला असता, संस्थेतील प्रशिक्षणार्थी महावितरण कंपनी, कारखान्यातील लेखा विभागात, आय.टी. कंपनी तसेच आपले स्वतःची ऑनलाईन कॉम्प्युटर सेंटर, बँक ग्राहक सेवा केंद्रे याद्वारे अर्थार्जन करत आहेत. त्यातील काही प्रशिक्षणार्थी आपली स्वतः ची मोटार रिवांडीगची तसेच लाईट फिटिंगची कामे करून रोजगार निर्माण करत आहेत. वेल्डर आणि फिटर व्यवसायातील यशस्वी प्रशिक्षणार्थी यांनी भारतीय रेल्वे, हिंदुस्थान एरोनॉटिक्स, माझगाव डॉक येथे अप्रेंटीस पूर्ण केल्या आहेत. तसेच येथील माजी प्रशिक्षणार्थी विविध संस्थेत निदेशक म्हणून कार्य करून कौशल्य वाढीस चालना देत आहेत. मोटार मेकॅनिक आणि ट्रॅक्टर मेकॅनिक व्यवसायातील प्रशिक्षणार्थी बस आगार, बॉर्डर रोड, तसेच विविध नामांकित मोटार व ट्रॅक्टर कंपनीत चांगल्या पदावर कार्यरत आहेत. तसेच स्वतचे वर्कशॉप उघडुन रोजगार निर्माण करत आहेत. सर्व्हेअर व्यवसायातील प्रशिक्षणार्थी मोठ्या रोड निर्माण कंपन्या, खाजगी जमीन मोजणी, शासकीय सर्वेक्षक पदावर रुजू होत आहेत. ड्रेस मेकिंग व्यवसाय, घरगुती तसेच टेलरिंग दुकानदार महिला - पुरुष यांच्यासाठी मोठा आधार ठरत आहे. नियमित डिजाइन सोबतच आधुनिक डिजाइन संस्थेतील प्रशिक्षणार्थी मार्फत मार्केट मध्ये प्रवेश करत असून त्याची जनतेतून मागणी वाढत आहे. राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून संस्थेत विविध उपक्रम संस्थेचे प्राचार्य केशव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, गटनिदेशक शामकांत डोंगे तसेच सर्व निदेशक, कार्यालयीन कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि सर्व प्रशिक्षणार्थी अतोनात परिश्रम घेऊन यशस्वी करतात.

### इंडस्ट्रीमध्ये व्हिजीटद्वारे मिळते ऑन जॉब ट्रेनिंग

संस्थेतील विविध कोर्सेसच्या प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष इंडस्ट्रीमध्ये व्हिजीट मिळवून दिल्या जातात. यामुळे त्यांना तेथील आधुनिक मशिनरी पाहायला आणि शिकायला मिळतात. अशा प्रकारे ऑन जॉब ट्रेनिंग देऊन वर्कशॉप मध्ये होणाऱ्या कामाचा थेट अनुभव दिला जातो.

### एकूण ९ ट्रेड आणि १५ तुकड्या

इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर, वेल्डर, फिटर, मोटार मेकॅनिक - ट्रॅक्टर मेकॅनिक, ड्रेस मेकिंग, टेलरिंग असे एकूण ९ ट्रेड संस्थेमध्ये आहेत आणि त्यांच्या १५ तुकड्यांच्या माध्यमातून दरवर्षी अंदाजे २०० प्रशिक्षणार्थी बाहेर पडतात.

### अप्रेंटीस द्वारे मिळते दरमहा १२ हजार मानधन

इलेक्ट्रिशियन आणि वायरमनचे बरेचसे प्रशिक्षणार्थी महावितरण कंपनीत अप्रेंटीस साठी रुजू झाले असून, त्यांना एक वर्षासाठी दरमहा १२ हजार मानधन मिळते, त्यानंतर पुढे पर्मनंट नोकरीत त्यांचा प्राधान्याने विचार केला जातो.

### विदेशातही पोहोचले संस्थेचे प्रशिक्षणार्थी

राज्य आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचणाऱ्या या संस्थेच्या प्रशिक्षणार्थी सोबतच सन २०२० च्या मोटार मेकॅनिकचा एक प्रशिक्षणार्थी युरोपमधील सिल्वोकिया येथील जग्वार कंपनीत नियमित पदावर चांगल्या पगारावर रुजू झाला आहे.

## धक्कादायक! पुण्यात दुचाकी चालकाचा पोलिसावर हल्ला, डोक्यात घातला दगड, आरोपी फरार

**आरंभ मराठी । पुणे**



पुण्यात पुन्हा एकदा पोलिसावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. फोनवर बोलत दुचाकी चालवणाऱ्या व्यक्तीला रोखल्यानं वाहतूक पोलिसांवरच प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. राजेश गणपत नाईक (वय ४७) असे गंभीर जखमी झालेल्या पोलीस हवालदाराचे नाव आहे. फुरसुंगीतील भेकराईनगर चौकात हा प्रकार घडला आहे. राजेश नाईक यांनी दुचाकी चालवताना फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीला अडवले होते. याचा राग आल्याने दुचाकीचालकाने रस्त्यात पडलेला दगड राजेश नाईक यांच्या डोक्यात मारला. यात राजेश नाईक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पुण्यातील मगरपट्टा परिसरात गेल्या महिन्यात म्हणजे ११ जानेवारीला एका युवकानं भररस्त्यात पोलिसाला मारहाण केली होती. या युवकानं प्रचंड नशा केली होती. दरम्यान, स्थानिकांनी या युवकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण हा नशेत होता. हा युवक मगरपट्टा भागात एका ज्येष्ठ नागरिकाला तो मारहाण करत होता. तसेच रस्त्यावरुन जात असलेल्या अनेकांना तो दगड सुद्धा फेकून मारत होता. दरम्यान, या ठिकाणी आपले कर्तव्य बजावत असलेले वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचाऱ्यांनी त्या तरुणाला हटकले होते. यावेळी राग अनावर झाल्यानं त्या तरुणाने थेट त्या पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडली होती. यानंतर जमावाने या तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिले. हडपसर वाहतूक विभागातील पोलीस कर्मचारी सायंकाळी मंगरपट्टा परिसरातील रासकर चौकात कर्तव्यावर होते. यावेळी विरुद्ध दिशेनं येणाऱ्या वाहनांवर ते कारवाई करत होते. त्यावेळी एक जण तिथे थांबलेल्या नागरिकांला दगडाने मारहाण करण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी इथं कर्तव्यावर असलेल्या वाहतून पोलिसाने त्याला हटकले. याचा राग आल्यानं त्या तरुणाने वाहतून पोलिसालाच मारहाम केल्याचा प्रकार घडला.

दरम्यान, या घटनेनंतर पुण्यात पोलिसच असुरक्षीत असल्याची चर्चा सुरु झाली आहे. कारण, वारंवार पुण्यात पोलिसांवर हल्ला केल्याच्या घटना घडत आहेत. या घटनामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होत आहे. दरम्यान, अशा हल्लेखोरावंर कडक कारवाई करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.



## स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांना गायनातून अभिवादन

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव शहरातील कलाविष्कार अकादमी द्वारा हौशी छंदी गायकांचा समुह मेलडी स्टार्स यांच्या वतीने स्वरसम्राज्ञी स्व.लता मंगेशकर यांच्या ३ ऱ्या पुण्यतिथी निमित्त त्यांनी गायलेल्या बहारदार गीतांच्या गायनातून अभिवादन करण्यात आले. प्रथम प्रतिमा पुजन संस्थापक अध्यक्ष युवराज नळे, समन्वयक शरद वडगावकर, सुशील कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ विधिज्ञ दिपक पाटील मेंढेकर, अनिल मालखरे,सौ. सविता भोसले, रविंद्र कुलकर्णी, विधिज्ञ सौ. विद्युलता दलभंजन, शेषनाथ वाघ, नितीन बनसोडे, धनंजय कुलकर्णी, मारुती लोंढे, सौ. सुलक्षणा टिळक, राजाभाऊ कारंडे, युवराज नळे,शरद वडगावकर, सुशील कुलकर्णी यांनी लता दिदींच्या बहारदार गीतांचे गायन केले. या अभिवादन मैफलीच्या यशस्वीतेसाठी सौ. पृथा कुलकर्णी,कु. अर्णवी,चि. ओझस कुलकर्णी, शिरीष श्रीसुंदर यांनी परिश्रम घेतले

## जिल्ह्यात बारावीचे ५२ तर दहावीचे ११६ परीक्षा केंद्र माध्यमिक शिक्षण अधिकाऱ्यांकडून परीक्षेची तयारी पूर्ण

**आरंभ मराठी । सातारा**



माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२५ या परीक्षेची तयारी पूर्ण झाली असून, इयत्ता बारावीचे जिल्ह्यात ५२ परीक्षा केंद्र असणार आहेत. तर दहावीचे ११६ परीक्षा केंद्र असणार आहेत. ११ फेब्रुवारी पासून बारावीची परीक्षा सुरू होणार असून, दहावीची २१ फेब्रुवारी पासून परीक्षा सुरू होणार आहे. या परीक्षेची संपूर्ण तयारी जिल्ह्यात झाली असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर यांनी दिली आहे.

इयत्ता बारावीची परीक्षा ही दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ ते १८ मार्च २०२५ या कालावधीत होणार असून, या परीक्षेसाठी जिल्ह्यातून ३४५६४ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. एकूण ५२ परीक्षा केंद्र असणार आहेत. तर दहावीची परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते १७ मार्च २०२५ या कालावधीत होणार असून यासाठी जिल्ह्यात मुख्य ११६ परीक्षा केंद्र असणार आहेत. तर ३८४८२ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसणार आहेत.या परीक्षांसाठी जिल्ह्यात १५ परिरक्षक कार्यालय असणार आहेत. त्यामध्ये कोरेगाव ,जावली,महाबळेश्र्वर,फलटण, माण,पाटण,वाई ,खंडाळा या तालुक्यात प्रत्येकी एक तर खटाव ,सातारा तालुक्यासाठी प्रत्येकी दोन,तर कराडसाठी तीन असे एकूण १५ परीरक्षक कार्यालय असणार आहेत. परीरक्षक कार्यालयातून पेपर मुख्य केंद्रांवर तिथून परत परीरक्षक कार्यालयात सहाय्यक परीरक्षकामार्फत (रनर) यांच्यामार्फत जमा होणार आहेत.

परीक्षेसाठी सात भरारी पथकांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आलेले आहेत. अशा परीक्षा केंद्रांवर केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तीची नियुक्ती सदर केंद्रावर समाविष्ट असणाऱ्या शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त इतर अन्य शाळा / उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांमधून करण्याची कार्यवाही यावर्षीच्या परीक्षेमध्ये करण्यात येणार आहे. यापूर्वी ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आलेले आहेत. असे बारावीचे १२ गैरमार्ग परीक्षा केंद्रे तर दहावी १७ गैरमार्ग परीक्षा केंद्र आहेत.

## नवोदय विद्यालयात हेरिटेज जतन, महत्त्व विषयावर व्याख्यान



**आरंभ मराठी । तुळजापूर**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, तुळजापूर येथे पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ ,सोलापूर येथील पुरातन भारतीय संस्कृती व पुरातत्व विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर एन. कोळेकर यांचे हेरिटेज जतन व महत्त्व यामध्ये विद्यार्थी व समाजाची भूमिका या विषयावर गुरुवारी (दि.६) व्याख्यान झाले. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थी ,शिक्षकेतर कर्मचारी अध्यापक वृंद उपस्थित होता. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के वाय .इंगळे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना संजय माने यांनी केली. प्रमुख पाहुणे प्रभाकर केळकर विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की ,हेरिटेज याचा मूळ अर्थ वारसा, भारताची संपूर्ण जगामध्ये ओळख टिकून ठेवण्यासाठी पूर्वजांनी दिलेला सांस्कृतिक, ऐतिहासिक ,सामाजिक ,आर्थिक वारसा जतन करणे ही आपली जबाबदारी आहे .या हेरिटेजमुळे स्मारके प्राचीन वास्तू, किल्ले, प्राचीन मंदिरे, लेण्या, पर्वतरांगा यांची ओळख होते. धाराशिव जिल्ह्यातील तेर येथील वस्तुसंग्रहालय, तुळजाभवानी मंदिर, नळदुर्ग किल्ला, रामलिंग मंदिर, येडेश्र्वरी मंदिर, परांडा किल्ला या ऐतिहासिक व पौराणिक वारसाची माहिती सांगून ही आपल्यासाठी प्रेरणास्थाने आहेत त्याचे जतन करणे आपले व समाजाचे कार्य आहे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमासाठी सचिन खोब्रागडे, डॉ. के सी चौधरी, चक्रपाणि गोमारे, यश पाटील, निषाद भुते, हरी जाधव, बसवराज कोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन एस. एस. माने यांनी केले

## कपडे काढले, हातपाय बांधले, कोकणात फिरायला गेलेल्या पर्यटकासोबत घडलं भयंकर

**आरंभ मराठी । सिंधुदुर्ग**

नैसर्गिक सौंदर्यानं नटलेल्या कोकणात दररोज हजारो पर्यटक फिरायला जात असतात. सुंदर समुद्र किनारे, हिरवेगार डोंगर यामुळे पर्यटकांचा कोकणात जाण्याचा कल प्रचंड असतो. पण नुकतंच कोकणात फिरायला गेलेल्या एका पर्यटकासोबत भयंकर घडलं आहे. संबंधित पर्यटकाला पाच ते सहा जणांनी बेदम मारहाण केली आहे. आरोपीनं पीडित तरुणाचे कपडे काढून हात पाय बांधून मारहाण केली आहे. याबाबतचे काही फोटोज समोर आले असून सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पर्यटक आपल्या काही मित्रांसोबत मुंबई गोवा महामार्गावरून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथे फिरायला गेला होता. सगळ्यांनी कुडाळ तालुक्यातील झाराप झिरो पॉइंट या पिकनीक स्पॉटला भेट दिली. यानंतर सर्वजण चहा पिण्यासाठी झाराप पॉइंट परिसरात थांबले. चहा पित असताना पीडित पर्यटकाच्या चहात माशी पडली. चहात माशी पडल्याने पर्यटकाने चहा विक्रेत्याकडे याची तक्रार केली.

## दहिटणा, बोडखा येथील अवैध दारू विक्रीवर निर्बंध घाला; ग्रामस्थांची पोलीस निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी



**आरंभ मराठी । परंडा**

परंडा तालुक्यातील दहिटणा, बोडखा येथील अवैद्य मद्यविक्रीवर तात्काळ निर्बंध घालावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामस्थांनी परंडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार यांच्याकडे निवेदनाद्वारे ही मागणी केली. पोलीस निरीक्षक यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे, की दहिटणा गावाची लोकसंख्या १३६५ असून गावात अवैद्य दारू विक्रीचे प्रमाण वाढले असुन गावातील तुरुण व जेष्ठ नागरीक दारूच्या आहारी गेल्यामुळे अनेक कुटुंबाचे संसार उध्दवस्त झाले आहेत. दारु पिण्याने अनेक लोक कर्जबाजारी झाले असुन, गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे गावातील नागरीकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गावातील अवैद्य दारू विक्री बंद करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## येरमाळा येथे स्काऊट- गाईडचा जिल्हा मेळावा उत्साहात सुरू

### शोभायात्रा आणि बक्षीस वितरणाने आज होणार समारोप

**आरंभ मराठी । येरमाळा**



धाराशिव भारत स्काऊट आणि गाईडचा जिल्हा मेळावा येरमाळा या ठिकाणी दिनांक ६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळा येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून कब बुलबुल, स्काऊट गाईड मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या मेळाव्यात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये लोकनृत्य,समूह गीत, तंबू सजावट,बिन भांड्याचा स्वयंपाक,संचलन स्पर्धा, शारीरिक प्रात्यक्षिके,हस्तकला, प्रश्र्नमंजुषा,भव्य शेकोटी स्पर्धा, शोभायात्रा इत्यादी मनोरंजनात्मक स्पर्धा घेतल्या जातात. या मेळाव्याचे उद्घाटन गुरुवारी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.धाराशिव अशोक पाटील, जिल्हा आयुक्त गाईड तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प.धाराशिव सुधा साळुंखे, जिल्हा संघटक स्काऊट विक्रांत देशपांडे, जिल्हा चिटणीस तथा उपशिक्षणाधिकारी माध्यमिक दत्तात्रेय लांडगे, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड सविता पांढरे, जिल्हा सहचिटणीस उषा सर्जे, शिक्षण विभागातील सर्व अधिकारी वर्ग व संस्थापक अध्यक्ष विद्यानिकेतन इंटरनॅशनल स्कूल येरमाळ्याचे सचिन पाटील उपस्थित होते. शुक्रवारी सकाळी सर्व धर्मीय प्रार्थना होऊन सदर मेळाव्याची सुरुवात झाली. जिल्ह्यातील विद्यार्थी दिवसभर विविध स्पर्धेमध्ये आनंदाने सहभागी झाल्याचे दिसले. या मेळाव्याचा शेवट आज (दि.८) शोभायात्रा काढून व बक्षीस वितरणाने होणार आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातील एकूण विद्यार्थी कब बुलबुल तीनशे स्काऊट गाईडचे सातशे विद्यार्थी व विद्यानिकेतन चे एक हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत.